# कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयात सांस्कृतिक व क्रिडा महोत्सव

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी

**आर्वी, दि. ०५**

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात 'युवास्पंदन' सांस्कृतिक व क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. चार दिवस चाललेल्या या महोत्सवात विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे आणि क्रीडा कौशल्याचे उत्कृष्ट सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली.

महोत्सवाची सुरुवात मेहंदी आणि पोस्टर स्पर्धेने झाली. मैदानी खेळांमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. आनंद मेळावा' आणि रांगोळी स्पर्धेला विद्यार्थ्यांनी मोठा प्रतिसाद दिला. क्रीडा विभागात बॅडमिंटन, भालाफेक, धावणे आणि पारंपारिक वेशभूषा स्पर्धा पार पडल्या. सांस्कृतिक कार्यक्रम सहकार सभागृहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषक शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा ॲड. शोभा काळे होत्या. उद्घाटन




मुख्याध्यापिका पद्मा चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून कृषक शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. अविनाश कदम व डॉ. रवींद्र सोनटक्के, डॉ. विजय खडसे उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात ॲड. शोभा काळे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा व्यासपीठाची गरज अधोरेखित केली. सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. नीरज केंडे यांनी प्रास्ताविकातून महोत्सवाच्या आयोजनामागची भूमिका विषद केली त्यानंतर रंगारंग कार्यक्रम सादर केले. यानंतर बक्षीस वितरण पार पडले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रवींद्र सोनटक्के होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून मॉडेल हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, प्राचार्य राजेंद्र सुपणार प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. प्रवीण काळे, प्रा. दर्शन चांभारे यांनी केले. तर आभार प्रा. आशिष पेठे, डॉ. निरज केंडे यांनी मानले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले स्नेहभोजनाने महोत्सवाची सांगता झाली.

तरुण भारत
Paschim Vidarbha | 2026-02-12 | Page- 9
epaper.tarunbharat.net

# कृत्रिम बुद्धिमत्तेचा सकारात्मक वापर करा : कुलगुरू डॉ. क्षीरसागर

## कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय परिषद




मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर. व्यासपीठावर उपस्थित ॲड. शोभा काळे, प्रदीप काळे व मान्यवर

◆ **आर्वी, ११ फेब्रुवारी**

कृत्रिम बुद्धिमत्ता चांगली की वाईट हा विषय आता चर्चेचा नाही, तर कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्याला स्वीकारावी लागेल. म्हणून कृत्रिम बुद्धिमत्तेचा सकारात्मक वापर करा, असे आवाहन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी केले.

येथील कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) विविध पैलू, शिक्षण, अर्थशास्त्र आणि विज्ञान या विषयावर आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कृषक शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष ॲड. शोभा काळे होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून कृषक शिक्षण संस्थेचे सचिव प्रदीप काळे, बीजभाषक म्हणून प्रा. डॉ. अजय कुशवाह, पवन चांडक, प्राचार्य डॉ. रवींद्र सोनटक्के, प्राचार्य डॉ. संजय धनवटे, डॉ. विजय खडसे, डॉ. उमेश मेश्राम, संयोजक डॉ. अमर सोटे उपस्थित होते.

डॉ. मनाली क्षीरसागर म्हणाल्या की, कृत्रिम बुद्धिमत्ताने माणूस तयार केला नाही तर माणसाने कृत्रिम बुद्धिमत्ता तयार केली. शिक्षक व संशोधक विद्यार्थ्यांनी त्याचा शिक्षणामध्ये चांगला वापर करावा. ग्रामीण विद्यार्थ्यांना तंत्रस्नेही बनवण्याकरिता कृत्रिम बुद्धिमत्तेवर परिषद आयोजित करून महाविद्यालयाने येणाऱ्या काळातील गरज ओळखली ही निश्चितच प्रशंसनीय बाब आहे, असे त्या म्हणाल्या.

ॲड. शोभा काळे यांनी विविध क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरासंबंधी चर्चा केली. प्रदीप काळे यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचे सकारात्मक व नकारात्मक दोन्ही पैलू मांडले.

पहिल्या सत्रामध्ये प्राचार्य डॉ. आशिष ससनकर यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता व शिक्षण या विषयावर मत मांडले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. नितीन माथनकर होते. दुसऱ्या सत्रामध्ये डॉ. तुषार चौधरी यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता व्यवस्थापन व सामाजिक शास्त्र या विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. देवेंद्र भोंगाडे होते. संशोधकांकरिता पेपर व पोस्टर सादरीकरण प्राचार्य डॉ. मोरेश्वर देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.

संचालन डॉ. मंजुषा भोयर, डॉ. अनुप गुंबळे, डॉ. नीरज केंढे यांनी तर आभार डॉ. श्यामप्रकाश पांडे, प्रा. शैलेश खंदारे, डॉ. मनीषा खाकरे, डॉ. हेमराज चौधरी, डॉ. प्रवीण काळे यांनी मानले. ◀*(तभा वृत्तसेवा)*

Powered by Bharati Web

देशोन्नती




# कृत्रिम बुद्धिमत्तेचा सकारात्मक वापर करावा

## कुलगुरू डॉ.मनाली क्षिरसागर यांचे प्रतिपादन

## कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय येथे कार्यक्रमाचे आयोजन

देशोन्नती वृत्तसंकलन

**आर्वी :** कृत्रिम बुद्धिमत्ता चांगली की वाईट हा विषय आता चर्चेचा नाही, तर कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्याला स्वीकारावी लागेल म्हणून

कृत्रिम बुद्धिमत्तेचा सकारात्मक वापर करावा. असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ.मनाली क्षिरसागर यांनी केले. कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय आर्वी येथे ' कृत्रिम बुद्धिमत्ता विविध पैलू, शिक्षण ,अर्थशास्त्र आणि विज्ञान ' या विषयावर आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनीय सत्रामध्ये उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या. कृत्रिम बुद्धिमत्ताने माणूस तयार केला नाही तर माणसाने कृत्रिम बुद्धिमत्ता तयार केली आहे. शिक्षकांनी व संशोधक विद्यार्थ्यांनी त्याचा चांगला वापर आपल्या शिक्षणामध्ये करावा. ग्रामीण विद्यार्थ्यांना तंत्रस्नेही बनवण्याकरता कृत्रिम बुद्धिमत्तेवर परिषद आयोजित करून महाविद्यालयाने येणाऱ्या काळातील गरज ओळखली आहे ही निश्चितच प्रशासनीय बाब आहे. असे देखील त्यांनी सांगितले. या सत्राचे अध्यक्ष म्हणून कृषक शिक्षण संस्था, आर्वीचे अध्यक्ष ॲड.शोभा काळे तर प्रमुख अतिथी म्हणून कृषक शिक्षण संस्था आर्वीचे सचिव प्रदीप काळे यांची उपस्थिती होती. सोबतच बीजभाषक म्हणून डॉ.अजय कुशवाह संगणकशास्त्र विभाग प्राध्यापक शारदा विद्यापीठ, ग्रेटर नोएडा यांची व पवन चांडक यांची उपस्थिती होती. विद्यापीठगीताने परिषदेची सुरुवात झाली. यावेळी व्यासपीठावर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,आर्वीचे प्राचार्य डॉ.रवींद्र सोनटक्के, नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज कारंजा (घा) चे प्राचार्य डॉ.संजय धनवटे, आर्वीचे आयक्युएअसी समन्वयक डॉ.विजय खडसे, कारंजा (घा) चे आयक्युएअसी समन्वयक डॉ.उमेश मेश्राम, संयोजक डॉ.अमर सोटे यांची उपस्थिती होती. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्रदीप काळे यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचे सकारात्मक व नकारात्मक दोन्ही पैलू मांडले. अध्यक्षीय भाषणामध्ये ॲड.शोभा काळे यांनी विविध क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरासंबंधी चर्चा केली. यानंतर झालेल्या पहिल्या तांत्रिक सत्रामध्ये डॉ.आशिष ससाणकर प्राचार्य, इंद्रप्रस्थ न्यू आर्ट कॉमर्स ॲंड सायन्स कॉलेज, वर्धा यांनी ' कृत्रिम बुद्धिमत्ता व शिक्षण ' या विषयावर आपले मत मांडले. या सत्राचे अध्यक्ष म्हणू डॉ.नितीन माथनकर प्राचार स्व.वसंतराव कोल्हटकर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय रोहणा यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यानंतरच्य दुसऱ्या तांत्रिक सत्रामध्ये डॉ.तुषा चौधरी यांनी ' कृत्रिम बुद्धिमत्त व्यवस्थापन व सामाजिक शास्त्र ' य विषयावर सखोल मार्गदर्शन केले. य सत्राचे अध्यक्ष डॉ.देवेंद्र भोंगाडे प्राचार्य अंतोदय महाविद्यालय देवग्राम यांची उपस्थिती होती. त्यासोबतच संशोधकांकरिता पेपर व पोस्ट सादरीकरण डॉ.मोरेश्वर देशमुख प्राचार्य, श्री समर्थ कला वाणिज्य महाविद्यालय आष्टी यांच्य अध्यक्षतेखाली सुरू होते. प्राचार डॉ.रवींद्र सोनटक्के यांच्य अध्यक्षतेखालील शेवटच्या अंतिम सत्रामध्ये प्रमुख पाहुणे म्हणू डॉ.मिलिंद पाटील माजी विभागप्रमुख सोबतच प्रमुख अतिथी डॉ.संजय धनवटे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यानंतर प्रमाणपत्र वितरित करून राष्ट्रगीताने या परिषदेची सांगत करण्यात आली.

## राष्ट्रीय परिषदेत विविध महाविद्यालयातील प्राध्यापकांची उपस्थिती

या संपूर्ण परिषदेमध्ये संचालनाची जबाबदारी डॉ. मंजुषा भोयर, डॉ. अनुप गुंबळे, डॉ. नीरज केंढे, यांनी पार पाडली. पाहुण्यांचा परिचय डॉ. पवन ठाकरे, डॉ. रोहिणी मेश्राम, डॉ. अनिल दहाट यांनी करुन दिला. तर आभार डॉ. श्यामप्रकाश पांडे, प्रा. शैलेश खंदारे, डॉ. मनीषा खाकरे, डॉ. हेमराज चौधरी, डॉ. प्रवीण काळे यांनी केले. या राष्ट्रीयपरिषदे करता विविध महाविद्यालयातील प्राध्यापकांची उपस्थिती होती. परिषदेच्या यशस्वीतेकरता महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी व रासेयो स्वयंसेवकांनी सहकार्य केले.

## राष्ट्रीय परिषद : कुलगुरु डॉ. क्षीरसागर ने किया छात्रों को संबोधित

# कृत्रिम बुद्धिमत्ता का सकारात्मक उपयोग

■ **आर्वी, (त.सं).** कृत्रिम बुद्धिमत्ता अच्छी की गलत यह विषय अब चर्चा का नहीं तो कृत्रिम बुद्धिमत्ता हमें स्वीकारनी पड़ेगी. इसलिए कृत्रिम बुद्धिमत्ता का सकारात्मक इस्तेमाल करें. ऐसे विचार राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय की कुलगुरु डॉ. मनाली क्षिरसागर कला वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय आर्वी में कृत्रिम बुद्धिमत्ता के विविध उपयोग, शिक्षण, अर्थशास्त्र और विज्ञान विषय पर राष्ट्रीय परिषद के उद्घाटनीय चरण में उद्घाटक के तौर पर बोल रहे थी. शिक्षक व अनुसंधानकर्ता छात्रों ने कृत्रिम बुद्धिमत्ता का उपयोग अपनी शिक्षा में करें. कार्यक्रम की अध्यक्षता कृषक शिक्षण संस्था के अध्यक्ष एड. शोभा काले ने किया. प्रमुख अतिथि के तौर पर कृषक शिक्षण संस्था सचिव प्रदीप काले, बीजभाषक ग्रेटर नोएडा शारदा विद्यापीठ के प्रा. डॉ. अजय कुशवाह, पवन चांडक, प्राचार्य डॉ. रवींद्र सोनटक्के कारंजा (घा), प्राचार्य डॉ. संजय धनवटे, आईक्यूएसी समन्वयक डॉ. विजय खडसे, आईक्यूएसी समन्वयक डॉ. उमेश मेश्राम, संयोजक डॉ. अमर सोटे उपस्थित थे. इस अवसर पर प्रमाणपत्र वितरित कर परिषद का समापन किया. संपूर्ण परिषद में संचालन की जिम्मेदारी डॉ. मंजूषा भोयर, डॉ. अनुप गुंबले, डॉ. नीरज केंढे ने पूर्ण की. अतिथि का परिचय डॉ. पवन ठाकरे, डॉ. रोहिणी मेश्राम, डॉ. अनिल दहाट ने किया. आभार डॉ. श्यामप्रकाश पांडे, प्रा. शैलेश खंदारे, डॉ. मनीषा खाकरे, डॉ. हेमराज चौधरी, डॉ. प्रवीण काले ने माना.




## कृत्रिम बुद्धिमत्ता व शिक्षण पर किया मार्गदर्शन

पहले तकनीकी चरण में इंद्रप्रस्थ कॉलेज वर्धा के प्राचार्य डॉ. आशिष ससनकर ने कृत्रिम बुद्धिमत्ता व शिक्षण पर विचार रखे. इस चरण की अध्यक्षता प्राचार्य डॉ. नितिन माथनकर ने की. दूसरे चरण में डॉ. तुषार चौधरी ने मार्गदर्शन किया. इस चरण की अध्यक्षता प्राचार्य डॉ. देवेंद्र भोंगाडे ने की. इसके साथ पेपर व पोस्टर प्रस्तुतिकरण प्राचार्य डॉ. मोरेश्वर देशमुख ने किया.

# कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयात सांस्कृतिक व क्रिडा महोत्सव

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**

**आर्वी, दि. ०५**

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात 'युवास्पंदन' सांस्कृतिक व क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. चार दिवस चाललेल्या या महोत्सवात विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे आणि क्रीडा कौशल्याचे उत्कृष्ट सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली.

महोत्सवाची सुरुवात मेहंदी आणि पोस्टर स्पर्धेने झाली. मैदानी खेळांमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. आनंद मेळावा' आणि रांगोळी स्पर्धेला विद्यार्थ्यांनी मोठा प्रतिसाद दिला. क्रीडा विभागात बॅडमिंटन, भालाफेक, धावणे आणि पारंपारिक वेशभूषा स्पर्धा पार पडल्या. सांस्कृतिक कार्यक्रम सहकार सभागृहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषक शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा ॲड. शोभा काळे होत्या. उद्घाटन




मुख्याध्यापिका पद्मा चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून कृषक शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. अविनाश कदम व डॉ. रवींद्र सोनटक्के, डॉ. विजय खडसे उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात ॲड. शोभा काळे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा व्यासपीठाची गरज अधोरेखित केली. सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. नीरज केंडे यांनी प्रास्ताविकातून महोत्सवाच्या आयोजनामागची भूमिका विषद केली त्यानंतर रंगारंग कार्यक्रम सादर केले. यानंतर बक्षीस वितरण पार पडले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रवींद्र सोनटक्के होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून मॉडेल हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, प्राचार्य राजेंद्र सुपणार प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. प्रवीण काळे, प्रा. दर्शन चांभारे यांनी केले. तर आभार प्रा. आशिष पेठे, डॉ. निरज केंडे यांनी मानले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले स्नेहभोजनाने महोत्सवाची सांगता झाली.

लोकमत समाचार

# एआई का सकारात्मक उपयोग जरूरी : क्षीरसागर




कार्यक्रम में मार्गदर्शन करती हुई कुलगुरु डॉ. मनाली क्षीरसागर व अन्य अतिथि.

लोकमत समाचार सेवा

**आर्वी :** कृत्रिम बुद्धिमत्ता (एआई) अच्छी है या बुरी, यह अब चर्चा का विषय नहीं रहा है, बल्कि हमें इसे स्वीकार करना ही होगा. इसलिए इसका सकारात्मक उपयोग किया जाना चाहिए. यह विचार राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय की कुलगुरु डॉ. मनाली क्षीरसागर ने व्यक्त किए.

वे कला, वाणिज्य एवं विज्ञान महाविद्यालय में आयोजित राष्ट्रीय सम्मेलन के उद्घाटन सत्र में बोल रही थी. सम्मेलन का विषय "कृत्रिम बुद्धिमत्ता : विविध आयाम, शिक्षा, अर्थशास्त्र और विज्ञान" था. डॉ. क्षीरसागर ने कहा कि कृत्रिम बुद्धिमत्ता ने मनुष्य को नहीं बनाया, बल्कि मनुष्य ने कृत्रिम बुद्धिमत्ता का निर्माण किया है. शिक्षकों और शोधार्थी विद्यार्थियों को इसका रचनात्मक और सकारात्मक उपयोग अपने अध्ययन एवं शोध कार्य में करना चाहिए. उद्घाटन सत्र की अध्यक्षता कृषक शिक्षण संस्था की अध्यक्ष एड. शोभा काले ने की. अतिथि के रूप में संस्था के सचिव प्रदीप काले, डॉ. अजय कुशवाह, पवन चांडक, प्राचार्य डॉ. रविंद्र सोनटक्के, नारायणराव काले स्मृति मॉडल कॉलेज के प्राचार्य डॉ. संजय धनवटे, आर्वी के आईक्यूएसी समन्वयक डॉ. विजय खडसे, आईक्यूएसी समन्वयक डॉ. उमेश मेश्राम तथा सम्मेलन के संयोजक डॉ. अमर सोटे उपस्थित थे.

सम्मेलन का संचालन डॉ. मंजुषा भोयर, डॉ. अनूप गुंबले एवं डॉ. नीरज केंदे ने किया. अतिथियों का परिचय डॉ. पवन ठाकरे, डॉ. रोहिणी मेश्राम एवं डॉ. अनिल दहाट ने करवाया. आभार डॉ. श्यामप्रकाश पांडे, प्रा. शैलेश खंदारे, डॉ. मनीषा खाकरे, डॉ. हेमराज चौधरी एवं डॉ. प्रवीण काले ने माना.